K.T.S.P.Mandal's

# Hutatma Rajguru Mahavidyalaya

Rajgurunagar, Tal-Khed, Dist- Pune

**2021-22**

Report

| | |
|---|---|
| The title of the event | **Inter Collegiate Best Physique(M) Competition** |
| Organizing Department | Department of Physical Education and Sports |
| The name of the organizer / coordinator | Prof. Pratima Lonari |
| Dated | 16th Dec 2021 |
| Venue | Vitthalraoji Butte Patil Sabhagruh |
| Number of participants | Various teams from the Pune District Zonal Sports Committee |
| Funds | Pune District Zonal Sports Committee & College |
| The objectives of the program | To prepare the team of the Pune District Zonal Sports Committee for the inter Zonal competition. |
| Summary | Pune District Zonal Sports Committee and Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar jointly organized an Inter Collegiate Best Physique (M ) competition at Vitthalraoji Butte Patil Sabhagruh on 16th Dec 2021. 21 Players from the various colleges of Pune District Zone participated in this competition. |

(Prof.Pratima Lonari)
Director of Physical Education & Sports

(Dr.V.D.Kulkarni)
Principal


2021
2022
19

Paper News in Sakal Paper dated 21st Dec 2021

सकाळ TODAY



# शरीरसौष्ठवमध्ये इंदापूर विजेते

## राजगुरुनगरमधील स्पर्धेत यश ; वेटलिफ्टिंगमध्ये इंद्रायणी महाविद्यालय अव्वल



राजगुरुनगर (ता. खेड) : शरीरसौष्ठव स्पर्धेतील 'बेस्ट पोझर' सुमीत बाईज.

राजगुरुनगर, ता. २० : येथील ...तात्मा राजगुरू महाविद्यालयात ...वित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ... पुणे जिल्हा विभागीय क्रीडा ...मितीअंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग ...मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) ...स्पर्धेतील शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये ... एस. सी. महाविद्यालय इंदापूर, ...या संघाने विजेतेपद पटकाविले. ...नूराजी भोसले महाविद्यालयाच्या ...सुमीत बाईज याला 'बेस्ट पोझर'; ...र भाळेगावच्या सी. एस. अँड सी. महाविद्यालयाच्या संकेत काळे याने ...आंतरमहाविद्यालयीन 'श्री २०२०-२१' हा मानाचा किताब संपादन केला.

या स्पर्धेतील शरीरसौष्ठव मुले स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयातील २१; तर वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता ३५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. शरीरसौष्ठवमध्ये मुलांच्या गटात नीलेश धावरे, सुमीत बाईज, काझी मोहम्मद सैफ,तेजस शिंदे, संकेत काळे, दिव्यांक आरू या खेळाडूंनी वेगवेगळ्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. वेटलिफ्टिंगमध्ये मुलींच्या गटात इंद्रायणी महाविद्यालयाने विजेतेपद; तर हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाला उपविजेतेपद मिळाले. सारिका शिनगारे, चेतना धोंडगे, सृष्टी थोरात, प्रतीक्षा फड, मृणाली भोग, रुचिका ढेरे या खेळाडूंनी विविध वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला. वेटलिफ्टिंगमधील मुलांच्या गटात दिग्विजय गोरडे, ऋषिकेश चव्हाण, सुमीत दळवी, ओंकार बोरकर, किरण जगताप, वरद वाघ, वैष्णव ठाकूर, चिराग बापुले, आयुष खंडागळे, अमित पाळुंज या खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेमध्ये हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर या खेळाडूंनी 'बेस्ट लिफ्टर' हा किताब मिळविला.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले, "कोरोनाकाळात शाळा व महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये पुन्हा क्रीडानैपुण्य निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडा शिक्षकांसमोर उभे ठाकले असून, त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी."

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी यांनी; तर प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. योगेश मोहिते यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये वाढविण्याचे आव्हान

राजगुरुनगर
जनप्रवास प्रतिनिधी

अँड. देवेंद्र बुट्टेपाटील



कोरोनाकाळात शाळा–महाविद्यालये बराच काळ बंद राहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडानैपुण्ये निर्माण करण्याचे मोठे आव्हान क्रीडाशिक्षकांसमोर उभे ठाकले असून त्यांनी अधिक परिश्रम घेऊन क्रीडासंस्कृती जोपासावी असे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती अंतर्गत आयोजित वेटलिफ्टिंग (मुले व मुली) व शरीर सौष्ठव (मुले) स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या प्रसंगी पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, बळवंत डांगले, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ.संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सहसचिव डॉ. सुनील पानसरे, डॉ. ज्ञानेश्वर चिमटे तसेच विविध महाविद्यालयातून आलेले शारीरिक शिक्षण संचालक, मार्गदर्शक, खेळाडू व पंच उपस्थित होते.

अँड. देवेंद्र बुट्टेपाटील पुढे म्हणाले की, ज्यांना खेळामध्ये गती आहे तसेच स्वतःमधल्या सृजनशीलतेला वाव देण्याची इच्छा आहे त्यांच्यासमोर क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे आगळेवेगळे क्षेत्रही करियर म्हणून खुले आहे. जिद्द व चिकाटीच्या जोरावर क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश संपादन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये निवड समिती सदस्य म्हणून प्रा. अनिल मरे, प्रा. उमेश जगताप, प्रा. रावसाहेब गरड तसेच वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेकरिता डॉ. शितल शेंडकर डॉ. पांडुरंग लोहोटे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रास्ताविक प्रा. प्रतिमा लोणारी तर आभार प्रा. योगेश मोहिते यांनी मानले.